क्र.महसूल/क-१/टे-८/बां.प./मौ.बापगांव-भिवंडी/एसआर-०९/२०२२
जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे
दिनांक :
13 FEB 2023

**वाचले :-**

१) मे. अरिहंत सुपरस्टक्चर्स लि. तर्फे श्री. अशोक भवरलाल छाजेर रा. अरिहंत औरा, बी-विंग, फ्लोअर नं.२५ प्लॉट नं.१३/१, टीटीसी इंडस्ट्रियल एरीया, ठाणे बेलापुर रोड, तुर्भे, नवी मुंबई यांचा दिनांक २७/०९/२०२२ रोजीचा अर्ज

२) या कार्यालयाकडील आदेश क्र. महसूल/क-१/टे-८/बां.प./मौ.बापगांव-भिवंडी/एसआर-०९/२०२२ दिनांक २४/०३/२०२२

३) सहायक संचालक नगररचना ठाणे यांचेकडील पत्र क्र.विशेप/बांप/मौ.बापगांव/ता.भिवंडी / स.नं.१४/१/ससंठाणे/२९०२ दि. ९/१२/२०२२

---

**दुरुस्ती आदेश :-**

ज्या अर्थी, उपोद्घातातील अनुक्रमांक १ अन्वये अर्जदार मे. अरिहंत सुपरस्टक्चर्स लि. तर्फे श्री. अशोक भवरलाल छाजेर यांनी दि. २७/०९/२०२२ अन्वये या कार्यालयाकडून क्र.महसूल/क-१/टे-८/ बांप/ मौ.बापगांव-भिवंडी/एसआर-०९/२०२२ दि. २४/३/२०२२ रोजी पारीत केलेल्या बांधकाम परवानगी आदेशातील अट क्र. १४ ची तसेच सहायक संचालक नगररचना ठाणे यांनी दि. १४/३/२०२२ रोजी सादर केलेल्या शिफारसतील अट क्र. १७ ची पुर्तता केलेली असून सदर अट रद्द करणेबाबत विनंती अर्ज केलेला आहे.

ज्या अर्थी, उपोद्घातातील अनुक्रमांक २ अन्वये या कार्यालयाकडून क्र.महसूल/क-१/टे-८/ बांप/ मौ.बापगांव-भिवंडी/एसआर-०९/२०२२ दि. २४/३/२०२२ रोजी पारीत केलेल्या बांधकाम परवानगी आदेशातील अट क्र. १४ मध्ये "प्रस्तुत प्रस्तावात ४५ मी. उंचीच्या (स्टील्ट + १४ मजले) च्या इमारती प्रस्तावित केलेल्या आहेत. सदर इमारती २४ मी. पेक्षा जास्त उंचीच्या असल्याने त्या "विशेष इमारती" होत असून मंजुर एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार अशा इमारती असलेल्या भूखंडास १२.०० मी. रुंदीचा पोहोच रस्ता काही भागापूरता उपलब्ध असून उर्वरीत भागासाठी सध्या रस्ता उपलब्ध नाही. अर्जदाराने परवानगी प्राप्त होण्यास सुलभतेच्या दृष्टीने एकाच टप्यात परवानगी अनुज्ञेय व्हावी, अशी अर्जदार यांनी विनंती केलेली आहे. त्यात त्यांनी सदरच्या १२.०० मी. रुंद रस्ता ६ महिन्यात त्यांच्याकडून उपलब्ध करुन विकसीत करण्यात येईल, असे नमुद केले असून सदर रस्ता विकसीत होईपर्यंत २३.७५ मी. उंचीपर्यंत (स्टिल्ट + ७ मजले) बांधकाम अनुज्ञेय करावे व १२.०० मी. रुंद रस्ता विकसीत झाल्यानंतर जास्त उंचीचे बांधकाम अनुज्ञेय करावे, अशी विनंती केलेली आहे. सदरची विनंती परवानगी घेण्याच्या सुलभतेच्या दृष्टीने मान्य करण्यात येत असून सद्यस्थितीत अर्जदारास २३.७५ मी. (स्टिल्ट + ७ मजले) उंचीचे बांधकामास अनुमती देण्यात येत आहे. या कार्यालयाकडून विकास परवानगीचे आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत सदर १२.०० मी. रुंदीचा पोहोच रस्ता अर्जदाराने स्वखर्चाने उपलब्ध व विकसीत करणे आवश्यक आहे. असे न केल्यास दिलेली

परवानगी रदद करण्यात येईल. व अशा परिस्थितीत अर्जदारास २३.७५ मी. उंची पर्यंतच्या इमारतींचा सुधारीत विकास परवानगी प्रस्ताव पुन:श्च सादर करुन या कार्यालयाकडून मंजुर करुन घ्यावा लागेल. सदर बाब अनुज्ञाग्राही यांचेवर बंधनकारक रहील." असे नमुद करणेत आलेले आहे.

ज्या अर्थी, या कार्यालयाकडून क्र.महसूल/क-१/टे-८/ बांप/ मौ.बापगांव-भिवंडी/एसआर-०९/२०२२ दि. २४/३/२०२२ रोजी पारीत केलेल्या बांधकाम परवानगी आदेशातील अट क्र. १४ चे अनुषंगाने सहायक संचालक नगररचना ठाणे यांनी उपोद्घातातील अ.क्र. ३ अन्वये सदर जागेची पहाणी केलली असता, सदर जागेवर १२.०० मी. रुंद रस्ता विकसीत झाल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच त्याबाबतचे जीपीएस फोटो व ग्रुप ग्रामपंचायत बापगांव / देवरुंग यांचे रस्त्याबाबत ग्रामसभा ठराव सादर केला असल्याचे नमूद केले आहे.

त्याअर्थी, आता महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४२(क) अन्वये जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडेनिहित करण्यांत आलेल्या अधिकारांचा वापर करुन मी जिल्हाधिकारी ठाणे याद्वारे मे. अरिहंत सुपरस्टक्चर्स लि. तर्फे श्री. अशोक भवरलाल छाजेर यांना त्यांचे विनंतीचे अनुषंगाने या कार्यालयाकडील बांधकाम परवानगी आदेश क्र.महसूल/क-१/टे-८/ बांप/ मौ.बापगांव-भिवंडी/एसआर-०९/२०२२ दि. २४/३/२०२२ मधील अट क्र. १४ मध्ये नमुद १२.०० मी. रुंदीचा पोहोच रस्ता अर्जदाराने स्वखर्चाने उपलब्ध व विकसीत केलेला असून सदर अटीमधील १२.०० मी. रुंदीचा पोहोच रस्त्याबाबतचा मुद्दा शिथील करणेत येत आहे.

सही/-
(अशोक शिनगारे)
जिल्हाधिकारी ठाणे

प्रति,
मे. अरिहंत सुपरस्टक्चर्स लि. तर्फे श्री. अशोक भवरलाल छाजेर स्वत: व
श्री. राजु सयानंद चंदवानी यांचे कु.मू.धारक म्हणून
रा. अरिहंत औरा, फ्लोअर नं.२६ प्लॉट नं.१३/१, टीटीसी इंडस्ट्रियल एरीया,
ठाणे बेलापुर रोड, तुर्भे एमआयडीसी, नवी मुंबई

प्रत :- तहसिलदार भिवंडी यांना माहितीसाठी
प्रत :- उपअधिक्षक भुमि अभिलेख भिवंडी यांना माहितीसाठी
प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भिवंडी यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी रवाना
प्रत :- तलाठी सजा लोनाड
प्रत :- कार्यालयीन संचिका.

(राजेंद्र चव्हाण)
तहसीलदार (महसूल)
जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे

(स्थळप्रतिवर मा.जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असे.)